This question paper consists of 37 questions and 8 printed pages.
ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण 37 प्रश्न आणि 8 छापील पाने आहेत.

Roll No.
अनुक्रमांक

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

Code No. 46/S/A/M
कोड नं.

# MARATHI
# (मराठी)
# (204)

Day and Date of Examination
(परीक्षेचा दिवस आणि तारीख) ____________________

Signature of Invigilators
(निरीक्षकाची सही)
1. ____________________
2. ____________________

**सामान्य अनुदेश :**

1 परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठांवर आपला अनुक्रमांक लिहावा.

2 कृपा करुन प्रश्न–पत्र तपासून घ्या की पुस्तकाचे एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठांवर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्यापण क्रमिक रुपात असावी.

3 बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला दिलेल्या पर्यायातून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यांत येणाऱ्या उत्तर–पुस्तिकांमध्ये योग्य उत्तर लिहायचे आहे.

4 बहुपर्यायी प्रश्नांचे सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यांत येणार नाही.

5 उत्तर–पत्रिकेत ओळख निदर्शनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहल्यास परिक्षार्थीला अयोग्य ठरविण्यांत येईल.

6 आपल्या उत्तर–पत्रिकांवर प्रश्न–पत्रिकेचा कोड संख्या **46/S/A/M** लिहावेत.

# MARATHI

# (मराठी)

# (204)

वेळ : तीन तास | एकूण गुण : 100

निर्देश :

1 सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

2 सर्व प्रश्न लक्षपूर्वक वाचून मगच प्रश्नाचे उत्तर घावे.

3 प्रश्न 1 ते 11 पर्यंत प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून लिहावा.

1 झेल्याने खिशांत काय ठेवले होते ? 1

(A) चिंचा (B) बोरे

(C) कैऱ्या (D) आवळे

2 टिळकांच्या मते आपण मराठी भाषेचा स्वीकार केला आहे, कारण 1

(A) ती आपल्याला जन्माबरोबर प्राप्त झाली आहे

(B) मराठी भाषा बोलणाऱ्यांची संख्या खूप आहे

(C) मराठी भाषा आपल्याला आवडते

(D) ती इंग्रजीपेक्षा चांगली भाषा आहे

3 योग्य पर्याय भरुन वाक्य पूर्ण करा 1

" ............ घेऊनि हाती पुरोपकंठी शुद्धमती"

(A) तबक (B) सुंदर परडी

(C) टोपली (D) पिशवी

4 आपल्याला ज्ञान देणारा पहिला गुरू कोण ? 1

(A) ग्रंथ (B) माता

(C) शिक्षक (D) पिता

5 ‘आता’ या कवितेत कवीच्या मते सूर्याकडे पाठ फिरवून शतकाचा प्रवास कोणी केला ? 1

(A) दलितांनी (B) व्यापाऱ्यांनी

(C) ब्राह्मणांनी (D) क्षत्रियांनी

6 योग्य शब्द भरुन काव्य पूर्ण करावे 1

‘............. अनुभव संतचि जाणति/येर ते हासति अभाविक॥’’

(A) ऋषींचा (B) थोरांचा

(C) संताचा (D) सूज्ञांचा

7 शुद्ध शब्द कोणता ? 1

(A) उद्धरणी (B) उदधरणी

(C) उधरणी (D) उध्दरणी

8 कवीने तळयांतील एका बदकाचे वर्णन कसे केले ? 1

(A) सुंदर (B) ओंगळवाणे

(C) कुरुप (D) बेताचे

9 कन्याकुमारी येथील पाण्याने वेढलेल्या खडकावर ध्यानस्थ कोण बसले होते ? 1

(A) अगस्ती (B) लेखक

(C) विवेकानंद (D) बगळा

10 योग्य वाक्प्रचार घालून वाक्य पूर्ण करा – ‘आपण केलेली खोडी उघडकीस आली तेंव्हा जयंताने...........’ 1

(A) सुपारी देणे (B) आकाश पाताळ एक केले

(C) कानामागून आली तिखट झाली (D) खडे फोडले

11 खालीलपैकी कोणत्या वाक्यात केवल प्रयोगी अव्यय वापरले आहे, ते ओळखा 1

(A) ती इमारत भव्य होती

(B) फार सुंदर इमारत होती ती

(C) वा ! काय शानदार इमारत हो ती !

(D) मला ती इमारत चांगली वाटली

12 झेल्या मास्तरांच्या घरी कोणकोणती कामे करी ? 1

13 एखादे दिवशी मागून अन्न मिळाले नाही तर डोंबारी काय खातात ? 1

14 'बलसागर भारत होवो' या कवितेत कवीने देशबांधवांना कशासाठी आवाहन केले आहे ? 1

15 ''तू तर माझ्याही पुढे गेलीस'' असे कोण कोणास म्हणाले ? 1

16 ''पाऊल चिन्हे'' या कवितेत कवी नक्षत्रांना कोणता प्रश्न विचारतो ? 1

17 चांगल्या कामाची गोडी कुणाला वाटावी असे ज्ञानेश्वर 'पसायदान' मध्ये म्हणतात ? 1

18 पुढील वाक्यांतील काळ ओळखा : 1

'काल मी मंडईतून भाजी आणली.'

19 नागू धाडसाची कामे कां करु शकत नसे ? 1

20 भगिनींनी ग्राममाता व्हावे असे कोण व कां म्हणाले ? 1

21 कवी सागरास नदीची शपथ कां घालतो ? 1

22 पुढे दिलेल्या शब्द समूहाबद्दल एक शब्द लिहा : 1

(i) विद्यार्थ्यांसाठी राहण्याची जागा

(ii) दुसऱ्यावर उपकार करणारा.

23 (अ) खालील शब्दांचे प्रत्येकी दोन दोन समानार्थी शब्द लिहा :– 2

(i) सूर्य

(ii) आकाश

(ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :– 2

(i) सत्य

(ii) स्वच्छ

(iii) दुष्ट

(iv) कुरूप

24 खालील उतारा लक्षपूर्वक वाचा व त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :

'पुण्याचा गणपतीउत्सव फार प्रसिद्ध. वर्तमानपत्रांत, दूरदर्शनवर आणि आकाशवाणीवर या उत्सवाविषयी इतके वाचायला, पहायला आणि ऐकायला मिळते की हा उत्सव पाहायला एकदा तरी पुण्याला गेलेच पहिजे असे दरवर्षी ठरवतो. पण आजपर्यंत कधीच जमले नाही. ते यावर्षी मात्र अगदी निश्चयच केला की जायचेच आणि खरोखरीच गणेशचतुर्थीला पुण्याला जाऊन आलो.

सगळयांच्या घरोघरी गणपती असतातच. पण सार्वजनिक गणपती उत्सव करणारी मंडळे आणि त्यांचे चौकाचौकातील गणपती हे खास पुण्यनगरीचे वैशिष्ट्य. मंडकाचे कार्यकर्ते एकत्र येऊन झटून कामाला लागतात आणि चौका–चौकात गणपती बसवून, सर्व कार्यक्रम यशस्वी

करतात. कोणाचे व्याख्यान, करमणुकीचे कार्यक्रम, तर कुठे वेगळ्या स्पर्धा. सगळे कार्यक्रम या चौक्रातच रस्त्यावर होतात. पण कोणालाच त्याची अडचण वाटत नाही. रहदारीला अडयळा झाला तरी ते 8-10 दिवस कोणीच फारसे मनावर घेत नाही. कारण हे गणपती लोकांचेच असतात ना ?

**प्रश्न :**

(i) उताऱ्याला योग्य शीर्षक द्या. **1**

(ii) कुठल्या उत्सवाबद्दल लेखक सांगत आहे ? **1**

(iii) सार्वजनिक उत्सवात काय काय कार्यक्रम असतात ? **1**

(iv) लेखकाच्या मते पुण्यनगरीचे वैशिष्ट्य काय आहे ? **1**

**25** खालील पद्यांश वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे थोडक्यांत लिहा :–

''संतकृपा झाली। इमारत फळा आली ॥1॥

ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया ॥2॥

नामा तयाचा किंकर। तेणे रचिले ते आवार ॥3॥

जनार्दन एकनाथ। खांब दिधला भागवत ॥4॥

तुका झालासे कळस। भजन करा सावकाश ॥5॥

बहिणी म्हणे फडकती ध्वजा। निरुपणा केले वोजा॥6॥

(i) ज्ञानेश्वरांनी कशाचा पाया रचला ? **1**

(ii) हे काव्य कुणी रचले ? **1**

(iii) भागवत धर्माची इमारत कोणकोणत्या संतामुळे उभी राहिली ? **2**

**26** (अ) बोणं म्हणजे काय ? ते कशासाठी शिजविले जाते ? **2**

(ब) राज्य स्थापनेच्या कार्यांत कसे वाहून ध्यावे, असे रामदास म्हणतात ? **2**

27 (अ) 'श्री' गिरवतांना लहानपणी लेखक कां घाबरला ? 3

(ब) म. फुले शेतकऱ्याचे चित्र कसे रेखाटतात ? 3

28 (अ) कवी मंगेश पाडगांवकर यांचे कोणत्या गोष्टीमुळे भान हरपून गेले आहे? 3

(ब) 'पहा टाकिले पुसुनी डोळे' या कवितेत एक पत्नी आपल्या शूर पतीला काय सांगते ? 3

29 (अ) केशवने कोणत्या गोष्टीवर नकार दिला ? कां ? 2

(ब) नामस्मरणाने भक्त प्रल्हादास काय मिळाले? 2

30 (अ) नागूला झोपेतून उठविण्यासाठी त्याची बायको काय करीत असे ? 3

(ब) डॉ. अब्दुल कलाम कोणते आवाहन करतात ? 3

31 (अ) खालील वाक्याचे ससंदर्भ स्पष्टीकरण करा – 3

'चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन।
ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु॥'

(ब) पावसाच्या धारा बरसल्यानंतर सृष्टीतील कोणती रुपे कवीला मोहित करतात ? 3

32 तुम्ही तीन मित्रांनी टी.व्ही. वर 'वर्ल्डकप टी ट्वेंटी' भारत व दक्षिण आफ्रिकेमधील क्रिकेट सामना बघितला. या संबंधीचा तुम्हा तिघा मित्रांचा संवाद स्वतःच्या शब्दांत सुमारे 8 ते 10 वाक्यांत लिहा. 4

33 खालील पैकी **एका** विषयावर निबंध लिहा (शब्द मर्यादा – **200**) 10

(i) नदीचे आत्मवृत्त

(ii) मी पंतप्रधान झालो तर

(iii) संगणक – शत्रू की मित्र

(iv) माझी आजी

**34** या पाठ्यपुस्तकातील सर्वात अधिक कोणती कविता तुम्हाला आवडली? कां आवडली ? त्या कवितेचे नाव, काव्य रचनाकाराचे नाव लिहा. **4**

**35** पत्र लेखनाचे नियम कटाक्षाने पाळून खालील पैकी **एका** विषयावर पत्र लिहा – **8**

(1) कॉमनवेल्थ गेम्स बघण्यास तुमच्या मित्रास दिल्लीस येण्याकरिता आमंत्रणाचे पत्र लिहा.

(2) वार्षिक परीक्षा चार दिवसावर आली असताना वीज प्रवाह वारंवार खंडित होऊ लागला व त्यामुळे अभ्यास नीट होत नाही असे जाणवले. तेंव्हा विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्याला तक्रार करणारे पत्र लिहा.

**36** खालील उतारा लक्षपूर्वक वाचा त्याचे स्वतःच्या शब्दांत एक तृतीयांश सारांश लेखन करा व उताऱ्यास योग्य शीर्षक द्या **4**

'प्रा. कार्व्हर यांचा कल बोलण्यापेक्षा बघण्याकडे अधिक! एखादा कोळी, एखाद्या फांदीवर आपले जाळे विणताना दिसला की, आपल्यालाही तसे विणता यावे म्हणून प्रा. कार्व्हर तासन तास प्रयत्न करीत, ''इतकं सुरेख विणकाम आपल्याला नाही बुवा जमत.'' असे म्हणून प्रामाणिक कबुली देण्यांत त्यांना कमीपणा वाटत नसे. प्रत्येक गोष्टीचे सूक्ष्म, शास्त्रशुद्ध अवलोकन करणे ही ज्ञानप्राप्तीच्या मार्गातील पहिली पायरी त्यांनी कधीच गाळली नाही आणि त्यांची विद्यार्थीदशाही कधी सरली नाही. एवदा थोर वैज्ञानिक आमरण विद्यार्थीच राहिला. निसर्गातील प्रत्येक गोष्टीमागचं 'कुतूहल' त्यांना नेहमीच खुणावीत राहिले.'

**37** गिरगावांत 20,000 लोकसंख्या आहे. त्यांत 4000 पुरुष व 4000 स्त्रिया आहेत. 8000 मुले व 4000 वयोवृद्ध आहेत. यावरुन वर्तुळालेख तयार करा. **4**